MHKO050028162021

सौ. अंजूम मोमीन
//विरुध्द//
श्री. महमद मोमीन वगैरे.

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ८०/२०२१ मधील**

**निशाणी क्र. ४ खालील आदेश**

अर्जदार हिने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये दाखल केला आहे. अर्जदार व वि.प.१ यांचा विवाह दिनांक ०१/०१/२०१७ रोजी इचलकरंजी येथे झाला. अर्जदार यांनी असे नमुद केले की, विवाहासाठीचा सर्व खर्च अर्जदार हिचे वडीलांनी केला आहे. वि.प.१ हे युक्ता मिडीया कंपनी, पुणे येथे नोकरीस असून त्यांना दरमहा रक्कम रु. ६५,०००/- इतका पगार आहे. लग्नानंतर अर्जदार ही वि.प.१ यांचेसोबत वडगाव व त्यानंतर पुणे येथे राहण्यास होती. अर्जदार, वि.प.१ व त्यांचे भाऊ पुणे येथे राहत असताना अर्जदार यांना पुणे येथे नोकरी लागली. वि.प.३ यांनी वेगवेगळया अटी अर्जदार हिचेवर लादायला सुरुवात केली. अर्जदार यांना नोकरी करत असताना पगाराची रक्कम चेकने मिळत होती. ती रक्कम वि.प.१ व २ हे काढून घेत. तसेच तिचेवर संशय घेऊन तिला शिवीगाळ करुन मारहाण करत. वि.प. ३ हया अर्जदार यांना नोकरी सोडून दे असे अर्जदार यांना दबाव निर्माण करत असे. वि.प.४ हे पुणे येथील घरात त्यांचे मित्र, नातेवाईक यांना बोलवून अनेक महिने तेथेच ठेवत व अर्जदार यांना अश्लील टोमणे मारत असत. सदर बाब वि.प.१ यांना सांगितली असता वि.प. १ यांनी अर्जदार हिचेशी भांडण करुन मारहाण केली व अर्जदार हिला स्वयंपाक घरात कोंडून ठेवले. वि.प.३ हया बुवा, मौली यांचेकडे जाऊन अर्जदार यांचेवर काळी जादू करण्याचा प्रयत्न करत. तसेच त्यास अर्जदार यांनी नकार दिला असता तिला उपाशी ठेवून मारहाण करत. तसेच कोठेही फिरायला गेल्यास तिचेशी भांडण करुन तिला आहे त्या जागी सोडून येत. वि.प. यांनी अर्जदार हिचे माहेरीकडील लोकांकडे तिची बदनामी केलेली आहे. जून-२०१९ मध्ये अर्जदार हिचे आईचे ऑपरेशन झाले असता तिला भेटण्यासाठी अर्जदार हिला विरोध केला. त्यानंतर काही दिवसांनी अर्जदार ही आईला भेटायला गेली या कारणावरुन भांडण करुन अर्जदार हिला मारहाण केली. अर्जदार व वि.प. यांचेतील वाद मिटविण्याचा ब-याचदा मध्यस्थांमार्फत प्रयत्न

केला व वि.प. यांनी अर्जदार हिला नांदवण्यास नकार दिला. तसेच १२ लाख रुपये इतक्या हुंडयाची मागणी केली. तसेच सोडचिठ्ठी देण्याची धमकी दिली. अर्जदार हिने त्यांना सोडचिठ्ठी दिली नाही म्हणून वि.प. यांनी तिला घरातून हाकलून दिले व नांदवण्यास नकार दिला. तसेच मुस्लीम समाजातील पध्दतीनुसार तिला तलाक दिला असे बोलून बाहेर काढले. वि.प. यांनी अर्जदार हिचे सर्व दागीने, वस्तु देण्यास देखील नकार दिला. त्याबाबत अर्जदार हिने पोलीस स्टेशन, वडगाव येथे तक्रार दाखल केली आहे. तसेच वि.प.१ यांनी दिनांक ०४.०४.२०२१ रोजी दुसरा विवाह देखील केला आहे. वि.प. यांनी अर्जदार हिचा त्याग केल्यानंतर तिच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था देखील केली नाही. त्यामुळे, अर्जदार हिने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वि.प. यांनी त्यांचे म्हणणे निशाणी १२ येथे दिले आहे व असे नमुद केले की, सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. वि.प.यांनी असे नमुद केले की, अर्जदार हिने पत्नी या धर्माचे कधीही पालन केले नाही. अर्जदार घरातील कामे करत नसे. याबाबत वि.प. यांनी अर्जदार हिचे माहेरच्या लोकांना सांगितले असता, ते त्यांची मुलगी उच्चशिक्षीत नोकरधारी असल्याने तिला काम करणे शोभत नाही असे म्हणत. अर्जदार ही मॉडर्न असल्याने तिला नमाज पडणे, कुराण पडणे, रोजा ठेवणे यावर विश्वास नव्हता. ती परपुरुषांशी दिलखुलास बोलणार, भेटणार, लेट नाईट पार्टया करणार असे वागत असे. तसेच संसाराचा सर्व खर्च हा वि.प.१ हाच करत असे. वि.प.१ हे अर्जदार यांच्या अवाढव्या खर्चामुळे कर्जबाजारी झाले आहेत. अर्जदार हया स्वतः वि.प. यांचा त्याग करुन कोठेतरी राहण्यास गेलेली होत्या. दरम्यान त्या ऑफीसमध्ये रोज यायच्या, पण वि.प. यांचेशी एक शब्दही बोलत नसे. असा प्रकार अर्जदार हिने वि.प. यांचेसोबत केल्यामुळे वि.प. यांनी तिला तलाकुल सुन्नत प्रमाणे दिला आहे. अर्जदार कधी सुट्टी असली तरी सासरी न येता माहेरी जायच्या. अर्जदार कधीही सासरी राहिल्या नव्हत्या व नाही. अर्जदार यांना खुप राग येत असल्याने वि.प. यांनी तिला नकार दिल्यास ती वि.प.१ यांचे अंगावर धाऊन येत असे व अश्लील शिवीगाळ करत असे. अर्जदार ही वि.प. यांना शारिरीक सुखापासून वंचीत ठेवत होती. अर्जदार यांचे संसाराकडे काडीमात्र लक्ष नव्हते. अर्जदार ही बी.ई (सी.एस.ई.) असून ती पुणे येथील Tribro Shoftech या कंपनीमध्ये नोकरीस होती. तसेच अर्जदार हिने युक्ता मीडीया, एलएलपी, पुणे या कंपनीमध्ये तीन वर्षे नोकरी केलेली आहे. त्यामुळे, तिला जास्त रक्कमेचे पॅकेज मिळून शकते. केवळ त्रास देणेसाठी

तिने सदरचा अर्ज दाखल केला आहे. कायद्याचा गैरवापर करुन सदरची खोटी केस दाखल केली आहे. दिनांक १४.०८.२०१९ नंतर ती वि.प. यांचा त्याग करुन निघून गेली, ती कुठे राहत होती याचा ठावठिकाणा वि.प.१ यांना लागू दिला नाही. त्यामुळे, सदर अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०४. अर्जदार हिने अर्जात केलेले आरोप हे गंभीर स्वरुपाचे आहेत. अर्जदार हिने सदर अर्जाच्या पुष्ट्यर्थ तिचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार हिने हुंडा मागणी, त्यातून शिवीगाळ व मारहाण तसेच चारित्र्यावर संशय घेणे या प्रकारचे गंभीर आरोप वि.प. यांचेविरुध्द केले आहेत. अर्जदार हिचे दागीने व वस्तू काढून वि.प. यांनी तिला हाकलून दिले. तसेच दुसरा विवाह देखील परस्पर केला आहे. याबाबत अर्जदार हिने प्रतिज्ञापत्र देखील सादर केले आहे. त्यावरुन अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब सिध्द होते. अर्जदार ही शिक्षीत असून तिचे इंजिनिअरींगचे शिक्षण पुर्ण झाले आहे. अर्जदार ही सध्या नोकरी करत नाही व माहेरी राहत आहे. तिच्या उदरनिर्वाहाचा सर्व खर्च हा माहेरच्या व्यक्ती करत आहेत. याऊलट, वि.प.१ हा एम.सी.ए.असून युक्ता मीडीया कंपनी, पुणे येथे नोकरीस आहे. त्यांचे दुमजली घरदेखील आहे. वि.प.१ यांचेवर इतर वि.प. यांची जबाबदारी नाही.

०५. The Ld. Advocate for opponent relied on ***Arvind Gupta Vs. Prabhajit Jauhar***, Hon'ble Delhi High Court held that the purpose of providing maintenance is to secure such facility and a life style which the wife enjoyed while leaving in the consortium. At the same time, it the wife is qualified and has the capacity to earn then the law does not expect such a spouse would sit idle and burden the other spouse with maintenance. In cited case, the wife was highly qualified and working in the reputed MNC and earning good salary. However, in present case although the applicant as capacity to earn, however due to domestic violence she lost her job and leaving at the mercy of her parents. Hence,

cited case law is not applicable to this case.

०६. The Ld. Advocate for opponent relied on ***Gourav Vs. Manjit Kaur***, wherein Hon’ble Punjab and Chandigarh High Court observed that domestic violence is a violence which is committed when parties are in domestic relationship sharing same household.

०७. The Ld. Advocate for opponent relied on ***Sayyad Ali Vs. Saheba Fatima, 2002 (1) MhLj 623***, wherein Hon’ble Bombay High Court held that wife has no justification for withdrawal from the company of her husband, grant of maintenance is liable to be set aside. सदर केसमध्ये वि.प. यांनी अर्जदार हिचेवर कौटूंबिक हिंसाचार करुन तिला घरातून हाकलून दिले व दुसरा विवाहदेखील केला. त्यामुळे, सदर न्यायनिर्णय या केसला लागू होणार नाही.

०८. The Ld. Advocate for opponent relied on ***Anil Kumar Vs. Shashi Bala and others***, wherein Hon’ble Himachal-Pradesh High Court observed that there was no evidence of violence, hence rejected claim of applicant. सदर केसमध्ये अर्जदार यांनी वि.प. यांचा कौटूंबिक हिंसाचार करुन त्याग केल्याची बाब अर्जदार हिने शाबीत केली आहे. त्यामुळे, सदर न्यायनिर्णय या केसला लागू होणार नाही.

०९. वि.प.१ यांनी त्यांचे उत्पन्न दायीत्वाचे प्रमाणपत्र निशाणी १६ येथे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांचेवर त्यांची गरोदर पत्नी, आई व वडील यांची जबाबदारी असल्याचे नमुद केले आहे. त्यांना दरमहा रक्कम रु.६२,०००/- इतका खर्च येतो. तसेच त्यांनी अर्जदार हिला दरमहा रक्कम रु. ३५,०००/- इतके उत्पन्न होते असे नमुद केले आहे. परंतू, स्वतःच्या उत्पन्नाबाबत कोठेही उल्लेख केला नाही. यावरुन वि.प.१ हे स्वतःचे उत्पन्न न्यायालयापासून लपवून ठेवत आहे ही गोष्ट दिसत आहे. त्यामुळे, अर्जदार हिने

वि.प.१ यांचे उत्पन्नाबाबत केलेली विधाने याचा विचार करणे योग्य होणारे आहे.

१०. अर्जदार ही केक, प्रेस्ट्री इ. तयार करुन कमविते असे त्यांनी नमुद केले आहे. तसेच ती तिच्या वडीलांसोबत राहते असे देखील त्यांनी नमुद केले आहे. परंतु, त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल केला नाही. अर्जदार हिला सदयस्थीतीत किती उत्पन्न आहे याबाबत वि.प. यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अर्जदार ही सध्या तिच्या वडीलांसोबत माहेरी राहत असल्याची बाब त्यांनी मान्य केली आहे. यावरुन अर्जदार ही कामधंदा करत नाही असे दिसून येणारे आहे. तसेच वि.प.१ हे युक्ता मिडीया कंपनी, पुणे येथे बिझनेस ॲनालीस्ट या पदावर कार्यरत असून त्यांना दरमहा रक्कम रु.६५,०००/- इतके उत्पन्न मिळते. वि.प.२ हे नोकरीस आहेत. वि.प.३ यांचे १२ पावरलूम माग आहेत. तर वि.प.४ यांचे मालकीची पोल्ट्री फर्म आहे. त्यामुळे, अर्जदार वगळता वि.प.१ यांचेवर अन्य कोणीही अवलंबून नाही.

११. सदर उत्पन्न व दायीत्व यांच्या प्रतिज्ञापत्रावरुन अर्जदार ही तिच्या माहेरी राहते व कोणताही कामधंदा करत नाही असे दिसून येते. याऊलट, वि.प. हे पुणे येथे चांगल्या पगाराच्या नोकरीवर आहेत. वि.प. यांनी अर्जदार हिचा त्याग करुन तिला घरातून हाकलून दिले. वि.प. यांनी त्यांचे विधीज्ञ यांचेमार्फत नोटीस पाठवून अर्जदार हिला तलाक दिल्याची बाब नमुद केली आहे. सदर नोटीस ही दिनांक २३.०४.२०२१ रोजीची आहे. तसेच अर्जदार हिने अर्जात व तिने पोलीसांत दिलेल्या तक्रारीमध्ये नमुद केले त्यामध्ये दिनांक ०४.०४.२०२१ रोजी वि.प. यांनी दुसरा विवाह गुपचुपपणे केल्याची बाब नमुद केली आहे. त्यामुळे, पहिला विवाह अस्तीत्वात असताना दुसरा विवाह वि.प.१ यांनी केल्याचे दिसून येते. तसेच सदरचा तलाक हा कायदेशिर नाही. सदर प्रकरणातील कागदपत्रे, दोन्ही पक्षकारांची विधाने यांचा विचार करता अर्जदार हिने तिच्या अर्जात नमुद केलेल्या कथनांमध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. अर्जदार हिने वि.प. यांनी तिचा कोटूंबिक हिंसाचार केल्याची बाब सिध्द केली आहे. वि.प. यांची आर्थीक परिस्थीती चांगली असताना देखील त्यांनी अर्जदार हिचा सांभाळ करण्यास, पोटगी देण्यास दुर्लक्ष करुन नकार दिला आहे. त्यामुळे, अंतरिम अर्जातील मागण्या मिळण्यास अर्जदार पात्र आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

**-: <u>आदेश</u> :-**

०१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. वि.प.१ यांनी अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.३०,०००/- (रुपये तीस हजार फक्त) इतकी रक्कम अंतरिम पोटगीसाठी अर्ज दाखल तारखेपासून सदर अर्जाचे अंतिम निर्णयापर्यंत अदा करावी.

०३. वि.प.१ यांनी अर्जदार राहत असलेल्या इचलकरंजी येथील वास्तव्याच्या ठिकाणी जाऊन कौटूंबिक हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करु नये अशी ताकीद वि.प.यांना देण्यात येते.

०४. सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प यांना विनामुल्य देणेत यावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AKASH BABURAO REDKAR
Date: 2022.02.09 17:30:44 +0530

दिनांकः ०९/०२/२०२२.
इचलकरंजी.

**( अे.बी.रेडकर )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | A. B. Redkar<br>3rd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 09/02/2022 |
| Order signed by P.O. on | 09/02/2022 |
| Order uploaded on | 09/02/2022 |